कमाल जमीन धारणा कायद्याखालील अधिकारी यांचा समावेश आहे. या सर्वांसमोर आमचे प्रतिनिधीत्व करतील. आवश्यक तेथे अर्ज व हमीपत्र जाबजबाब व इतर कागदपत्रे देतील.

२७] आमच्यावतीने नोटीस व रिट ऑफ समन्स स्वीकारणे व कुठल्याही प्रकारचा करार किंवा दस्त ऐवज करणे व त्यावर सह्या व स्वाक्षऱ्या करणे की, जो सदर विकास प्राधिकरणास आवश्यकता असेल, जो काही कोर्टात दावा असेल त्यामध्ये योग्य तो जाबजबाब दाखल करुन तो आमच्या वतीने डिफेन्ड करणे.

२८] सदर मिळकती संबंधी विक्रीसंबंधी वृत्तपत्रात जाहीरात दिल्यावर कोणाही व्यक्तीकडून अथवा संस्थेकडून कुठल्याही प्रकारची हरकत अथवा बोजा आढळल्यास त्याचे निवारण करणे व जो काही त्या संदर्भात खर्च लागेल तो आमच्या वतीने करणे, काही त्याच प्रमाणे सदर मिळकतीचा सर्व घेतल्यावर कुठल्याही व्यक्तीचा अथवा संस्थेचा किंवा बँकांचा बोजा आढळल्यास त्याचे आमचे वतीने निवारण करणे व जो काही खर्च येईल तो आमच्या विक्री मोबदल्याचे रकमेतून वजा करणे.

२९] आमच्या वतीने सदर मिळकतीचा टॅक्स, सेल्स, बिनशेती अॅफिसर, असेसमेंट अथवा कुठल्याही प्रकारचा खर्च येईल तो करणे.

ठचोधरी
निळू
मनुबाई
भोरी
विठाबाई
शंकुतला
बेबीबाई

३०] सदर मिळकतीवर कोणताही क्लेम किंवा डिमांड असेल तर त्याचे आमच्या वतीने निवारण करणे.

३१] सदर मिळकतीबाबत कोणीही हरकत उत्पन्न केल्यास अगर दावा हक्क, हित, सत्ता संबंध सांगितल्यास त्या कामी जरूर ती सिव्हील व क्रिमीनल प्रोसिडींग्ज दाखल करणे व त्या कामी पुरावा देणे. आमचे विरूद्ध कोणीही अशा प्रकारचे प्रोसिडींग्ज सुरू केल्यास त्या कामी संबंधित न्यायालयात हजर राहणे, जाबजबाब देणे व पूर्व व उत्तर पक्ष करणे वगैरे कायद्याप्रमाणे सदर बाबतीत अन्य जरूर ती सर्व कामे करणे व त्यासाठी लागणारा सर्व खर्च करणे.

३२] सदर मिळकतीचे बाबतीत जरूर पडेल त्यावेळी कागद दस्तऐवज करण्यासाठी अगर कोर्टातील कामासाठी वकील नेमणे, त्याची फी ठरविणे, अर्ज, ॲफिडेव्हीट, दावा, कैफियत, फौजदारी, केस अपिल वगैरे सर्व कागदांवर व व्हेरीफीकेशनवर वकीलांच्या सल्ल्यानुसार सह्या करणे व त्यांच्या मार्फत काम चालविणे.

३३] सदर मिळकतीचा कुठलाही भाग सरकार जमा झाला असल्यास सरकारला पाहिजे असल्यास किंवा महानगर पालिकेच्या विकास आराखड्यानुसार आरक्षणाखाली असल्यास

तो देणे व त्यावर लागणा-या कागदपत्रांवर सह्या व स्वाक्ष-या करणे व त्याबद्दल मिळणारा मोबदला वा सेट बॅक, टि.डी.आर. एफ.एस.आय. मिळविणे.

३४] सदर मिळकतीवरील नियोजित इमारतीमधील सदनिका/गाळे/दुकाने/पार्किंग प्लेस/गॅरेज इत्यादींची विक्री डेव्हलपर्सच्या संमत्तीने करणे व त्या संबंधाने योग्य तो करार करणे व त्याच प्रमाणे सदर कराराद्वारे येणारी रक्कम डेव्हलपर्संना परस्पर घेऊ देणे. सदरचे करार संबंधीत दुय्यम. निबंधक साहेब यांजकडे नोंदणीसाठी सादर करणे व ते केल्याचे आमचे वतीने मान्य करणे वा पॅकेजडीलचे अॅग्रीमेंट करणे आवश्यक ठरल्यास तसे करुन वरील प्रमाणे तेही नोंदवून घेणे.

३५] सदर मिळकतीवर बांधल्या जाणा-या नियोजित इमारतीमधील फ्लॅट/गाळे धारकांची सहकारी गृह निर्माण संस्था किंवा अपार्टमेंट ओनर्स असोशीएशन किंवा प्रायव्हेट लि. कंपनीची स्थापना करणे व ती सक्षम प्राधिकारीणीकडून नोंदवून घेणे प्र त्यास्तव आवश्यक त्या सर्व गोष्टी करणे. त्यात विहीत नमून्यात अर्ज करणे, कागदपत्रे सादर करणे, अॅफिडेव्हीट, हमीपत्र इत्यादी देणे आवश्यक ती फी भरणे व इतर खर्च करणे.

३६] सदर मिळकतीचा विक्रीचा व्यवहार पूर्ण झालेवर सदर मिळकतीचे खरेदीखत एक्झीक्यूट करणे व सदर खरेदीखत मेसर्स अजानेया लॅन्ड अॅन्ड प्रॉपर्टी डेव्हलपर्स अथवा नियोजित इमारतीतील फ्लॅट धारकांचे हौसिंग सोसायटीच्या नावे अथवा मेसर्स अजानेया लॅन्ड अॅन्ड प्रॉपर्टी डेव्हलपर्स हे निर्देशित करतील त्या व्यक्ती/संस्थेच्या नावावर करुन देणे. त्याच प्रमाणे सदर खरेदीखतावर आमच्या वतीने सहया व स्वाक्षऱ्या करणे व ते नंतर दुय्यम निबंधक उल्हासनगर यांचे कार्यालयात जाऊन सदर खरेदीखतावर आमच्या वतीने सह्या केल्याचे मान्य करणे व त्यांच्या रेकॉर्ड बुकावर सहया करणे व खरेदीखताचे आमचे वतीने एक्झीक्यूशन पूर्ण करणे.

३७] आमच्या वतीने इनकम टॅक्स कायद्याखालील कलम २३०-अ ची परवानगी अथवा क्लीअरन्स करणे व त्याकरिता योग्य तो अर्ज करुन सदर कार्यालयात सुपूर्द करुन योग्य ती फी अथवा खर्च करणे.

३८] आमच्या वतीने सदर कुलमुखत्यारपत्र त्याचे व्यतिरिक्त दुसऱ्या व्यक्तींना सबस्टीटयूट कुलमुखत्यार म्हणून नेमणे व आम्ही वरील प्रमाणे जे जे काही अधिकार दिले आहेत ते देणे जेणे करुन सदर मिळकतीचे विकास कार्य करणे सोपे जाईल.